# 3 जानेवारी 2022 चालू घडामोडी PDF Download

**चालू घडामोडी (3 जानेवारी 2022)**



15 ते 18 वर्षे वयोगटातील मुलांचे लसीकरण आजपासून सुरू :

- करोनाच्या उत्परिवर्तित ओमायक्रॉन या विषाणूचा वेगाने प्रसार सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर देशात 15 ते 18 वर्षे वयोगटातील मुलांचे लसीकरण आजपासून सुरू होत आहे.

- मुलांच्या लसीकरणासाठी कोव्हॅक्सिन ही लस वापरण्यात येणार असून, राज्यातील **650 केंद्रांवर सुमारे साठ लाख मुलांचे लसीकरण** करण्यात येणार आहे.
- मुलांच्या लसीकरणासाठी कोविन संकेतस्थळावर **नावनोंदणी 1 जानेवारी सुरू करण्यात आली** आहे.
- तसेच प्रत्यक्ष लसीकरण केंद्रावर नाव नोंदणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- **2007** मध्ये किंवा त्यापूर्वी जन्मलेली सर्व मुले करोना प्रतिबंधात्मक लसीकरणासाठी पात्र आहेत, अशी माहिती राज्याच्या आरोग्य विभागाने दिली.

**Must Read (नक्की वाचा):**

चालू घडामोडी (2 जानेवारी 2022)

संमेलनाध्यक्षपदी भारत सासणे यांची निवड :

- उदगीर येथील 95 व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाध्यक्षपदी भारत सासणे यांच्या नावावर रविवारी महामंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले.
- **नागपूर, मुंबई, पुणे व औरंगाबाद** या सर्व घटक मंडळांकडून आलेल्या नावांवर चर्चा झाल्यानंतर काही मिनिटांतच सासणे हेच अध्यक्ष होतील, असे ठरविण्यात आले.
- अध्यक्षपदासाठी घटक संस्थांकडून प्रवीण दवणे, रामचंद्र देखणे, तारा भवाळकर व अनिल अवचट यांची नावेही चर्चेत होती.

महिलांच्या विवाहाच्या वयाची चिकित्सा :

- महिलांचे विवाहासाठीचे कायदेशीवर वय हे **18 वर्षांवरून 21 वर्षे** करण्याची तरतूद असलेल्या विधेयकाची चिकित्सा ज्या संसदीय समितीकडून केली जाणार आहे, तिच्या 31 सदस्यांत केवळ एक महिला आहे.
- तर हे बालविवाह प्रतिबंधक कायदा सुधारणा विधेयक हिवाळी अधिवेशनात लोकसभेत सादर करण्यात आले होते.
- तसेच ते चिकित्सेसाठी संसदेच्या शिक्षण, महिला, बालक, युवा आणि क्रीडा विषयक स्थायी समितीकडे पाठविण्यात आले आहे.
- तर या विधेयकातील तरतुदींचा देशातील महिलावर्गावर दूरगामी परिणाम होणार आहे.

दिनविशेष:

- **3 जानेवारी** हा दिवस 'बालिकादिन' तसेच 'ऑक्युपेशन थेरेपी दिन' म्हणून पाळला जातो.
- पहिल्या स्त्री शिक्षिका आणि समाजसुधारकसावित्रीबाई फुले यांचा **जन्म 3 जानेवारी 1831** रोजी झाला होता.
- हिन्दी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि पटकथालेखक चेतन आनंद यांचा **जन्म 3 जानेवारी 1921** मध्ये झाला होता.
- **सन 1950** मध्ये पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते पुणे येथे राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (NCL) उद्घाटन झाले.
- **3 जानेवारी 1952** रोजी स्वतंत्र भारतात पहिल्या राष्ट्रीय निवडणुका झाल्या.
- नायगाव येथील सावित्रीबाई फुले यांचे जन्मघर **सन 2004** मध्ये राज्य संरक्षित स्मारक राष्ट्राला अर्पण केले.

# Arogya Vibhag Exam Information

| क्रं | परीक्षेचे नाव | टेस्ट लिंक |
|---|---|---|
| 1 | आरोग्य विभाग भरती परीक्षा संपूर्ण माहिती | माहिती पहा |
| | आरोग्य विभाग भरती परीक्षा जाहिरात डाउनलोड करा | डाउनलोड करा |
| 2 | आरोग्य विभाग भरती परीक्षा अभ्यासक्रम PDF डाउनलोड | डाउनलोड करा |
| 3 | **आरोग्य विभाग ऑनलाइन टेस्ट सिरिज** | टेस्ट_सोडवा |
| 4 | आरोग्य विभाग भरती परीक्षा प्रश्नपत्रिका डाउनलोड करा | डाउनलोड करा |
| 5 | आरोग्य विभाग भरती परीक्षा पात्रता | माहिती पहा |
| 6 | आरोग्य विभाग भरती नोट्स | माहिती पहा |
| 7 | आरोग्य विभाग भरती परीक्षा पुस्तक यादी | डाउनलोड करा |
| 8 | आरोग्य विभाग भरती परीक्षा अभ्यास नियोजन | डाउनलोड करा |
| 9 | आरोग्य विभाग भरती परीक्षा प्रश्न विडियो पहा | विडियो पहा |

| क्रं | परीक्षेचे नाव | टेस्ट लिंक |
|---|---|---|
| 10 | आरोग्य विभाग भरती परीक्षा | डाउनलोड करा |
| 11 | आरोग्य विभाग ऑनलाइन टेस्ट सिरिज | टेस्ट_सिरिज सोडवा |

